# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com


<u>५७) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि१६.०९.२०२५</u>

जिल्हा : धुळे

| मागील आठवड्यातील हवामान (०९/०९/२०२५ ते १५/०९/२०२५) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (१७/०९/२०२५ ते २१/०९/२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | दिनांक | १७ | १८ | १९ | २० | २१ |
| | | | | | | | पाऊस (मिमी) | ६ | १२ | ९ | ५ | ३ |
| | | | | | | | कमाल तापमान (अंसे) | २८ | २८ | २९ | ३१ | ३१ |
| | | | | | | | किमान तापमान (अंसे) | २४ | २४ | २३ | २३ | २२ |
| | | | | | | | ढग स्थिती (आकाश) | ७ | ७ | ७ | ७ | ८ |
| | | | | | | | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ८९ | ८९ | ८९ | ८९ | ८९ |
| | | | | | | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ६० | ५९ | ६३ | ६५ | ६५ |
| | | | | | | | वाऱ्याचा वेग (किमी/ तास) | १० | १० | ९ | १० | १० |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र , मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार पुढील पाच दिवस आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे . **तसेच काही ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे.** |
| सामान्य सल्ला | | १) हवामान अंदाज आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमानाकरीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>२) वीजेच्या अंदाजाचा पूर्वानुमानाकरीता दामिनी मोबाईल ॲपचा वापर करावा. |
| संदेश | | **तुर पिकामध्ये वाझ रोगाचाप्रादुर्भाव दिसून आल्यास रोगग्रस्त झाडे उपटून नष्ट करावी..** |
| कापूस | फुले उमलणे ते बोंड धरणे | सध्याच्या वातावरणात फुलकिड्यांचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्यावर दिसून येत आहे , त्यासाठी फिप्रोनील ८० डब्लूजी @ २ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| भुईमुग | शेंगा पोसण्याची अवस्था | पिकावर मावा आणि तुडतुड्यांच्या प्रादुर्भावाचे सतत निरीक्षण करावे. जर किडींचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीवर आढळल्यास इमिडाक्लोप्रिड १७.८ एसएल @ ३ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| मूग, उडीद | साठवणूक | शेंगा खळयावर चांगल्या वाळल्यावर काठीच्या सहाय्याने झोडपून दाणे अलग करावेत. साठवण कोंदट किंवा ओलसर जागेत करू नये. शक्य झाल्यास धान्यास १ टक्का करंज किंवा एरंडीचे तेल चोळावे किंवा कडुनिंबाचा पाला (५ टक्के) धान्यात मिसळून धान्य साठवावे. यामुळे धान्य साठवणुकीतील किडींपासून संरक्षण होते. |
| सोयाबीन | शेंगा सुटण्याची अवस्था | ढगाळ वातावरणामुळे पिकांमध्ये पाने खाणाऱ्या अळीचा (स्पोडोप्टेरा) प्रादुर्भाव आढळून येतो. त्याच्या नियंत्रणाकरिता फ्लूबेंडामाईड २० % डब्लू.जी. ६ ग्रॅम अथवा फ्लूबेंडामाईड ३९.३५% एसी ३ मिली अथवा इंडोक्झाकार्ब १५.८० % ई.सी. ६ मिली अथवा स्पिनेटोरम ११.७० % एस.सी. १० मिली प्रति १० लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी. |
| मका | कणसे सुटताना | मागील काही दिवसांपासून ढगाळ वातावरणामुळे लष्करी अळीचा प्रादुर्भाव आढळून येत आहे , त्याकरीता खालीलप्राणे फवारणी करावी.<br>१) अळीच्या वाढीच्या लवकरच्या (१ ते ३ अवस्था) अवस्थांमध्ये निमअर्क १५०० पीपीएम ५ मिली किंवा निंबोळी अर्क ५% यांची प्रती लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. अथवा<br>२) क्लोरँट्रनिलीप्रोल १८.५% एस सी ४० जी.ए.आय./ हेक्टर किंवा इमामेक्टीन बेंझोएट ५% एस जी ८ ग्रॅम प्रति लि. या प्रमाणात फवारणी करावी. अथवा<br>३) स्पिनेटोरम ११.७ एस. सी. या कीटकनाशकाची ०.५ मिली प्रति लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. अथवा<br>४) इमामेक्टीन ५% + बेन्झोएट ल्युफेनुरॉन ४०% डब्लू.जी.०.२ ग्रॅम किंवा नोव्हालुरॉन ५.२५% + इमामेक्टीन बेंझोएट ०.९% एस सी ३ मिली प्रती लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. |
| कांदा | लागवड | रांगडा कांदा लागवडीसाठी बसवंत ७८० , फुले समर्थ, एन-२-४-१ इत्यादी सुधारीत वाणांची निवड करावी.<br>लागवडीची वेळ: सप्टेंबर - ऑक्टोबर. |

# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

| | | |
|---|---|---|
| | | बियाण्याचे प्रमाण: ८ ते १० किलो/ हेक्टर |
| **भाजीपाला** | **उगवण** | भाजीपाला पिकांमध्ये लागवडीनंतर रसशोषक किडीच्या जैविक नियंत्रणाकरीता पीकाच्या अवस्थेनुसार पिवळे चिकट सापळे, सापळा पिके, जैविक बुरशीनाशके (मेटारायझीयम, ट्रायकोग्रामा, व्हरटीसिलीयम इ.) यांचा वापर करावा. रसशोषक किडीचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात आढळून आल्यास रासायिनक कीडनाशके आणि बुरशीनाशकाचा वापर करावा. |
| **लिंबू वर्गीय फळझाडे** | | पाने खाणाऱ्या अळया हाताने गोळा अळया गोळा करून नष्ट कराव्यात.<br>प्रदुर्भावाच्या सुरवातीस ५% निंबोळी अर्क म्हणजे ५०० ग्रॅम निंबोळी पावडर अधिक वॉशिंग पावडर @ १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>जर प्रादुर्भाव अधिक असेल तर क्विनालफॉस २५ ईसी @ ३० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

**स्त्रोत :**

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान :

ठिकाण : मफुकृवि , राहुरी.

दि. : १६.०९.२०२५

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा**

**प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**